# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in





जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ५७७/पोलीस अधिक्ष,क कार्यालय भंडारा, दिनांकः- २७ /१०/२०१८

## ''खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस आजन्म कारावास व आर्म ॲक्ट मध्ये ३ वर्ष सजा द्रंव्यदंडाची शिक्षा''

पोलीस ठाणे भंडारा येथील आरोपी नामे अभिजीत उर्फ अभय केवल कोचे वय २५ वर्ष, रा. रमाबाई आंबेडकर वार्ड गणेशपुर भंडारा याने मुकेश भिमराव भैसारे वय ३५ वर्ष, रा.रमाबाई आंबेडकर वार्ड गणेशपुर भंडारा यास चाकुने भोकसुन जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप सिध्द् झाल्याने आज दिनांक २६/१०/२०१८ रोजी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री.संजय आ.देशमुख भंडारा सा. यांनी आरोपीचे कृत्य व गुन्हयाची गंभिरता लक्षात घेवुन आरोपीस आजन्म सश्रम कारावास व व २५,०००/—रू. द्रव्यदंडाची शिक्षा सुनावली

याबाबत अधिक माहिती अशी आहे की, दिनांक ०८/०४/१६ ला तक्रारदार भिमराव कुकसु भैसारे वय ६६ वर्ष रा. रमाबाई आंबेडकर वार्ड गणेशपुर भंडारा यांनी पोलीस ठाणे भंडारा येथे येवुन तोंडी तक्रार दिली की, मुलगा मुकेश भैसारे व अभय केवल कोचे हे घराजवळ राहत होते.अंदाजे १० वर्षापुर्वी मुलगा मुकेश व अभय कोचे यांची बहीण हे दोघेही मॉडल स्वराज एजन्सी येथे काम करीत होते. मुलगा मुकेश भैसारे याने अभय कोचे याचे बहीणीला लग्नाकरीता मागणी केली होती. त्यावरुन मुलीचा भाऊ अभय कोचे याने-मुलगा मुकेश याला धमकी दिली होती की, तु माझ्या बहीणीला कसा काय मागतो तुझी माझी बहीण मागण्याची औकात नाही. मी तुला पाहुण घेईन अशी धमकी दिली .
माझा सागिल भाऊ विश्वनाथ नंदेश्वर याने सांगितले की, अभय कोचे व आंडा कोचे यांनी मुलगा मुकेश याला चाकुने मारल्याने डोक्याला, डाव्या बाजुला, डाव्या मांडीला जखम झाली असुन त्याच्या डाव्या मांडीत चाकु खुपसलेला आहे. त्यामुळे मी सामान्य रूग्नालय भंडारा येथे मुलाला पाहण्याकरिता गेलो असता मुलाला चाकुचे वार लागलेले होते व तो जखमी अवस्थेत होता. त्याला काय झाले हे विचारले असता त्याने सांगितले की, अभय कोचे याने आंडा कोचे याचे सोबत मिळुन त्याच्या बहीनीला १० वर्षापुर्वी लग्नाकरिता मागण्याचे कारणावरून मारहाण केली आहे. असे सांगितले वरून अपराध क्रमाक ७९/२०१८ कलम ३०७ भा.द.वी सहकलम ४,२५ आर्म ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदवुन गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक. ऋषिकेश चाबुकस्वार यांनी सुरू केला.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक व्हि. पी. चव्हाण यांनी करून आरोपी नामे अभिजीत उर्फ अभय केवल कोचे वय २५ वर्ष, रा.रमाबाई आंबेडकर वार्ड गणेशपुर भंडारा यास अटक करून गुन्हयाचा तपास केला तपासात आरोपी विरूध्द् योग्य व सबळ पुरावे प्राप्त झाल्याने आरोपी विरूध्द् गुन्हयात कलम ३०७ भा.द.वी सहकलम ४,२५ आर्म अॅक्ट अन्वये पोउपनि. ऋषिकेश चाबुकस्वार आरोपपत्र तयार करून सत्र न्यायालय भंडारा येथे दाखल केले सदर आरोपपत्रास केस.क्र. ३२/१६ सदर गुन्हयाची सुनावणी **मा. अतिरिक्त सत्र न्यायाधिश श्री. संजय आ.देशमुख** . यांचे समक्ष चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **अॅडव्होकेट श्री.रमाकांत खत्री, सहा. सरकारी अभियोक्ता**, सत्र न्यायालय भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. आज दिनांक २६.१०.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेवुन आरोपी नामे **अभिजीत उर्फ अभय केवल कोचे वय २५ वर्ष, रा. रमाबाई आंबेडकर वार्ड गणेशपुर भंडारा जि. भंडारा** यांचे विरूध्द दोषसिध्द झाल्याने **कलम ३०७ भादवि अन्वये** आजीवन कारावास व सहकलम ४,२५ आॅर्म अॅक्ट ३ वर्ष सजा व २५,०००/—रु. दंड, अशी शिक्षा सुनावण्यात आली. सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक सुधाकर चव्हाण ठाणेदार भंडारा यांचे मार्गदर्शनात पो.हवा. मेश्राम पो.स्टे. भंडारा यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

( जितेंद्र के. आडोळे)
पोलीस उप निरीक्षक,
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत:** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.